*Janardan Bhagat Shikshan Prasarak Sanstha's*
**C. K. THAKUR VIDYALAYA, NEW PANVEL**
**ENGLISH MEDIUM -SECONDARY SECTION**
**Plot: 8, Sector: 14, Janardan Bhagat Marg CIDCO Colony, New Panvel, TN: 27463729, E-mail: ckteshm@gmail.com**
School Code / Index: (1) HSE & NTSE: **1403039**; (2) U-DISE: **27240818843**; (3) SSC: **17.01.017**

**id.25.09.2025**

# सी. के. टी में हिंदी दिवस का जल्लोष

१४ सप्टेंबर हा राष्ट्रीय हिंदी दिवस काही कारणास्तव आज दि. २५ सप्टेंबर रोजी सी.के.ठाकूर विद्यालयात मोठ्या जल्लोषात साजरा झाला. यावेळी जवाहर लाल नेहरू पोर्ट ट्रस्ट विद्यालयाच्या प्राध्यापिका मा. सौ प्रमिला संतोष पवार प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या सुरूवातीला विद्यालयातील संगती शिक्षक श्री. रूपेश मढवी सर यांनी आणि विद्यार्थी गायकवृदांनी सुरेल गणेशवंदना सादर केली. नंतर विद्यार्थी गायकवृंदाने सुमधूर हिंदी स्वागतगीत गायले. आजच्या कार्यमातील प्रमुख अतिथींचा परिचय हिंदी शिक्षक श्री. प्रमोद शेळके सर यांनी करून दिला. कार्यक्रमाची प्रस्तावना हिंदी विभाग प्रमुख सौ. शशिकला पाटील यांनी केली. विद्यार्थ्यांनी नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या जीवनावर आधारित हिंदी नाटिका ''नेताजी एक ज्वाला'' , सोशल मिडिया का इस्तेमाल याविषयावर आधारित एक नाटक तसेच राजस्थानी नृत्य असे अप्रतिम कार्यक्रम सौ. शशिकला पाटील आणि इतर हिंदी शिक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली सादर केले.या निमित्त हिंदी कविता गायन तसेच हिंदी भाषा विषयक भाषण यांचे उत्कृष्ट सादरीकरण विद्यार्थ्यांनी करून उपस्थितांची मने जिंकली. सह शिक्षक श्री. अशोक पाटील सर यांनी शिक्षक मनोगत व्यक्त केले.

यावेळी मा. सौ प्रमिला संतोष पवार यांनी विद्यार्थ्यांना सांगितले की हिंदी ही एक जीवनावश्यक भाषा तर आहेच परंतु आज सामान्य व्यवहारापासून ते चित्रपटसृष्टीपर्यंत सगळीकडे हिंदीचाच बोलबाला आहे त्यामुळे ती एक राष्ट्रीय भाषा असल्याचा अभिमान असलाच पाहिजे परंतु म्हणून इतर भाषांना कमी लेखता कामा नये. भाषा हा कधीच वादाचा विषय असूच शकत नाही असेही त्या म्हणाल्या. कार्यक्रमाच्या उत्कृष्ट आयोजनाकरिता त्यांनी शिक्षकांचे अभिनंदन केले.

शाळेच्या प्रगतीसाठी तत्पर असलेल्या मुख्याध्यापक श्री. संतोष चव्हाण यांनी प्रमुख अतिथी यांची प्रशंसा केली. मुख्याध्यापक श्री संतोष चव्हाण यांनी मार्गदर्शपर भाषणात हिंदी विभाग प्रमुख सौ. शशिकला पाटील आणि हिंदी विभागातील सर्व शिक्षकांचे अतिशय सुनियोजित आणि अप्रतिम कार्यक्रम सादर केल्याबद्दल विशेष कौतुक केले. तसेच विद्यार्थ्यांनी भविष्यात आपल्यातील कला गुणांना वाव देण्यासाठी अशा सहशालेय उपक्रमात वेळोवेळी सहभागी झालेच पाहिजे असेही ते म्हणाले.

सौ. प्रगती जाधव मॅडम आणि  जिया फडके व सांची पंडित या विद्यार्थ्यांनी उत्कष्ट सूत्रसंचलन केले. कार्यक्रम शिस्तीत पार पाडण्यात श्री. अशोक पाटील यांनी महत्वाची भूमिका बजावली. सौ. प्रगती जाधव यांच्या आभार प्रदर्शनाने कार्यक्रमाची सांगता झाली.


Janardan Bhagat Shikshan Prasarak Sanstha
Changu Kana Thakur Vidyalaya, New Panvel.
English Medium - Secondary Section
१४ सितंबर
हिंदी


Janardan Bhagat Shikshan Prasarak Sanstha
Changu Kana Thakur Vidyalaya, New Panvel.
English Medium - Secondary Section
१४ सितंबर
हिंदी


Janardan Bhagat Shikshan Prasarak Sanstha
Changu Kana Thakur Vidyalaya, New Panvel.
English Medium - Secondary Section
१४
सितंबर